असा. क्र. ३ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, जानेवारी ४, २००५/पौष १४, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.**—महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | पृष्ठे ७-९ |

दिनांक ४ जानेवारी २००५ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला, महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ४ जानेवारी २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६२ चा महा. ५. २००४ चा महा. अध्या २८.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २३ ऑगस्ट २००४ रोजी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २००४ हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००४ असे म्हणावे.

(२) तो दिनांक २३ ऑगस्ट २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ७८ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ७८ मधील, पोट-कलम (१क) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— १९६२ चा महा. ५.

" (१क) कलम ७९ क च्या तरतुदींनुसार स्थापन करण्यात आलेली एक जल व्यवस्थापन व स्वच्छता समिती देखील असेल. ".

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ७९क ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ७९क ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीची रचना.

**" ७९क.** (१) कलम ८१ च्या तरतुदींना अधीन राहून, जल व्यवस्थापन व स्वच्छता समिती पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल,—

| | | |
|---|---|---|
| (क) | जिल्हा परिषदेचा अध्यक्ष, | पदसिद्ध सभापती ; |
| (ख) | कलम ७८ च्या पोट-कलम (१) अन्वये रचना केलेल्या सर्व विषय समित्यांचे सभापती, | पदसिद्ध सदस्य ; |
| (ग) | जिल्हा परिषदेने परिषद सदस्यांमधून निवडून द्यावयाचे चार परिषद सदस्य, यांपैकी दोनपेक्षा कमी नसतील इतके सदस्य, महिला सदस्य असतील, | सदस्य , |
| (घ) | मुख्य कार्यकारी अधिकारी, | पदसिद्ध सदस्य ; |
| (ड.) | कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा), जिल्हा परिषद ; कार्यकारी अभियंता (लहान पाटबंधारे), जिल्हा परिषद, | पदसिद्ध सदस्य ; |
| (च) | स्वच्छता पाहणारे जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, | पदसिद्ध सदस्य ; |
| (छ) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), आणि | पदसिद्ध सदस्य ; |
| (ज) | अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, | पदसिद्ध सदस्य-सचिव : |

परंतु, समितीस, आपली कामे आणि कर्तव्ये पार पाडताना समितीस सहाय्य किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनाकरिता, विशेष निमंत्रित म्हणून, जलसंधारण, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छता या विषयातील क्षेत्रात काम करणाऱ्या व या विषयांचे विशेष ज्ञान व अनुभव असणाऱ्या, जिल्ह्यातील सहाय्य संघटनांच्या (अशासकीय संघटना, समंत्रक, शैक्षणिक संस्था) दोन पेक्षा अधिक नाही इतक्या प्रतिनिधींना निमंत्रित करता येईल :

परंतु, आणखी असे की, खंड (घ), (ङ), (च), (छ) व (ज) अन्वये नियुक्त केलेले पदसिद्ध सदस्य आणि समितीच्या बैठकीला किंवा बैठकींना हजर राहण्यासाठी निमंत्रित केलेले विशेष निमंत्रक, यांना समितीच्या चर्चेत भाग घेता येईल परंतु अशा बैठकींमध्ये मत देण्याचा कोणताही हक्क असणार नाही.

(२) जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीला या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तद्न्वये विषय समितीला नेमून देण्यात आलेल्या विषयांच्या संबंधात विषय समितीला जे सर्व अधिकार असतील आणि ज्या अधिकारांचा ती वापर करीत असेल ते, सर्व अधिकार जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीला जलसंधारण, जतन, वापर, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छता या विषयांच्या संबंधात असतील आणि ती त्यांचा वापर करील.".

२००४ चा महा. अध्या. २८. ४. (१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २००४ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००४ चा महा. अध्या. २८ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदीन्वये करण्यात आलेली कृती, किंवा, यथास्थिती, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई